MHGO060009652024

म. कौ. हिं. का.अर्ज क्र– २४/२०२४
प्रिती वि. देवचंद + ३

आदेश नि. क्र. ५ खाली
(आदेश पारीत दिनांक २२.०४.२०२६)

अर्जदाराने सदरचा अर्ज अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) अर्जदाराने अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार हिचे गैरअर्जदार क्र. १ सोबत जातीरिवाजाप्रमाणे दिनांक २६.०४.२०२४ रोजी अर्जदाराचे वडीलाचे घरी मु. वारव्ही पो. केशोरी ता. अर्जुनी/मोरगांव जि. गोंदिया येथे विवाह कार्य पार पडले. अर्जदार ही गैरअर्जदाराच्या घरी दिनांक २६.०४.२०२४ ला विवाह संपन्न झाल्यानंतर नांदण्यास आली तेव्हापासून चार महीने अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ सोबत राहीली. या कालावधीमध्ये अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे कुठलेच वैवाहीक/शारीरीक संबंध प्रस्तापित झालेले नाही. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारापासून वेगळा झोपत होता. त्यांचे एकमेकांसोबत कुठलेही प्रेमसंबंध प्रस्तापित झाले नाही.

३) अर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २०.०८.२०२४ ला रक्षाबंधनाचे औचित्य साधून अर्जदार ही माहेरी वारव्ही येथे गेली. तेव्हापासून गैरअर्जदार हा कधीही अर्जदारास नांदविण्यासाठी घेण्यास आला नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराला कोणताही पालणपोषण व औषध, अन्न व कपडे इत्यादी साठी पैशाची मदत करीत नव्हता. गैरअर्जदार क्र. १ हा दररोज सेंटींगच्या कामावर जातो त्यापासून दररोज ३००/– रुपये रोज व गैरअर्जदारांकडे पाच एकर डबल

फसलेची शेती सुध्दा आहे. त्यापासून वर्षाकाठी ५ लाखाचे उत्पन्न कमवितो. गैरअर्जदार क्र. १ यांच्यावर अर्जदार व्यतिरीक्त कोणाच्याही पालन पोषणाची जबाबदारी नाही. गैरअर्जदाराने आजपर्यंत अर्जदारास कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे, अर्जदार हिने रु. ५,०००/– दरमहा अंतरीम पोटगीची रक्कमेची मागणी केलेली आहे.

४) गैरअर्जदाराने त्याचे उत्तर निशाणी क्र.११ वर दाखल केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे विवाह झाल्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांच्या घरी नांदायला आली असता गैरअर्जदारांचे संयुक्त कुटुंब होते. त्यांच्या कुटुंबात आई वडील, मोठे भाउ व वहीनी संयुक्तपणे राहत होते. ती नांदायला आल्यानंतर अवघ्या आठ दिवसानेच आशिष कुंभरे रा. परसटोला हा मुलगा गैरअर्जदाराच्या घरी आला त्यावेळी अर्जदाराने तो तिचा मेहुणा लागतो म्हणून सर्वांना सांगितले. आशिष कुंभरे हा जवळपास आठ दिवस गैरअर्जदारांच्या घरी राहीला. या कालावधीत आशिषने अर्जदारासोबत अनेकदा अश्लील चाळे केले होते त्यामुळे तो अर्जदाराचा पुर्वीचा प्रियकर असल्याचे सर्वांचे लक्षात आले. त्यासंबंधाने गावातील पंच बोलावून मिटींग भरविण्यात आली होती त्या मिटींगमध्ये अर्जदाराला चांगले वागण्याची व नांदण्याची समज देण्यात आली होती त्यानंतर सुध्दा अर्जदाराच्या वागणुकीत कोणताही फरक आढळून आला नाही.

५) गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की अर्जदार ही त्यानंतर सुध्दा वांरवार आपल्या माहेरी जायची व तासनतास आपल्या मोबाईलवर बोलत रहायची. अर्जदार ही फक्त तिन महीने गैरअर्जदारांच्या घरी राहीली परंतु या कालावधीत ती गैरअर्जदारांच्या कुटुंबियासोबत बरोबर वागत नव्हती. ती नेहमीच गैरअर्जदार क्र. १ सोबत भांडण करायची त्याचप्रकारे ती गैरअर्जदार क्र. १ ला 'तु माझ्या लायकीचा नाहीस, तुझ्यापेक्षा मला चांगला नवरा मिळाला असता' अशाप्रकारे बोलून त्याचा अपमान करायची. आशिष कुंभरे हा अधुन मधून अर्जदाराला भेटायला येत रहायचा व

त्याबाबत अर्जदाराला काही बोलले तर ती भांडण करुन आपल्या माहेरी निघून जायची. अर्जदार हिच्या वाईट वागणुकीमुळे व तिच्या गैरवर्तणुकीमुळे तीन ते चारदा पंच लोकांना बोलावून मिटींग भरविण्यात आली होती. त्यावेळी माहुरकुडा येथील सरपंच व गावातील तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्री चंदु शहारे हे हजर होते त्यांनी सुध्दा अर्जदाराला बराच समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु तिच्या वागणुकीत कोणताही फरक आढळून आला नाही.

६) गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की मागील ऑगस्ट २०२४ मध्ये रक्षाबंधनाच्या वेळी अर्जदार ही आपल्या माहेरी गेली व तेव्हापासून गैरअर्जदाराच्या घरी नांदायला आली नाही. त्यानंतर तंटामुक्त समितीच्या मिटींगमध्ये तिने गैरअर्जदार क्र. १ सोबत मी नांदणार नाही मला सोडचिठ्ठी पाहीले असे स्पष्टपणे उत्तर दिले होते. वास्तविक अर्जदार हिचे आशिष कुंभरे या मुलासोबत प्रेमसंबंध असल्यामुळे तिने आपल्या माहेरी राहण्याचा निर्णय घेतलेला आहे. गैरअर्जदार क्र. १ हा स्वतः आपल्या वडील व भावाच्या आश्रयावर अवलंबून आहे व त्याची वेगळी कोणतीही कमाई नाही त्यामुळे तो अर्जदाराला वेगळी पोटगी देवू शकत नाही. करिता, गैरअर्जदाराने सदर अर्ज खर्चासहीत खारीज करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

७) अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांवरुन खालील मुद्दे उपस्थीत झालेले आहेत. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदारांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार हअंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? असल्यास किती ? | होय, गैरअर्जदार क्र. १ कडुन अर्जदार ही रक्कम रुपये २५००/- प्रतीमहा अंतरीम पोटगी म्हणुन |

| | | |
|---|---|---|
| | | मिळण्यास पात्र आहे. |
| ३. | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करीता

८) अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी आहे. अर्जदार हीने अर्जात असे कथन केले आहे की, गैरअर्जदार व तिच्यामध्ये कुठलेही प्रेमसंबंध प्रस्तापित झाले नाही. तसेच दिनांक २०.०८.२०२४ रोजीपासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असतांना गैरअर्जदार हा कधीही अर्जदारास नांदविण्यासाठी घेण्यास आला नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ अर्जदाराला कोणताही पालणपोषण व औषध, अन्न व कपडे इत्यादी साठी पैशाची मदत करीत नव्हता. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामधील नातेसंबंध लक्षात घेता त्यांच्यामध्ये 'कौटुंबिक नातेसंबंध' असल्याचे दिसते. अभिलेखावरुन अर्जदार कलम २ (अ) प्रमाणे 'पिडीत महीला' असल्याचे दिसते. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराला मानसिक त्रास देवून कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

### मुद्दा क्र. २ करीता

९) अर्जदाराच्या कथनानुसार ती तिचे वडिलांकडे राहत आहे. तिच्याकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. तिने पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार क्र. १ हा दररोज सेंटींगच्या कामावर जातो त्यापासून त्याला दररोज ३००/– रुपये रोज व गैरअर्जदारांकडे पाच एकर डबल फसलेची शेती सुध्दा आहे. त्यापासून वर्षाकाठी ५ लाखाचे उत्पन्न कमवितो. याउलट गैरअर्जदाराने असे कथन केले की, गैरअर्जदार क्र. १ हा स्वतः आपल्या वडील व भावाच्या आश्रयावर अवलंबून आहे व त्याची वेगळी कोणतीही कमाई नाही त्यामुळे तो अर्जदाराला वेगळी पोटगी देवू शकत नाही.

१०) वरील चर्चेनुसार असे निष्पन्न होते की, गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ वेगळे राहत आहे. तसेच अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र. १ वर पती म्हणून अर्जदार हीला सांभाळण्याची कायदेशीर तसेच नैतीक जबाबदारी आहे. परंतु अर्जदार माहेरी गेल्यापासून गैरअर्जदाराने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तरतुद केलेली नाही. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, गैरअर्जदार क्र. १ हा शारिरीकदृष्टया सुदृढ आहे. गैरअर्जदार यांच्या शारिरीक परिस्थितीचा विचार करता त्यास प्रतिदिन रु.३००/– प्रमाणे अकुशल कामगार म्हणून सहज मजूरी उपलब्ध होवू शकते. म्हणून माझ्या मते गैरअर्जदार क्र. १ ची अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची रककम पुरविण्याची ऐपत आहे व अर्जदार ही उदरनिर्वाह खर्च मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती, सद्ययाची महागाई, अर्जदाराची सामाजिक व राहती परिस्थिती, दैनंदिन खर्चाकरीता अर्जदाराला लागणारा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता अर्जदार हिला रु. २५००/– प्रतिमाह अंतरिम पोटगी मंजुर करणे उचीत व न्यायोचीत ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>**

११) अर्जदाराने तिचे हक्क प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. अर्जदाराची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता खालील अंतरिम आदेश पारीत करणे संयुक्तीक ठरते. मुद्दा क्र. ३ च्या उत्तराप्रित्यर्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१] अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२] गैरअर्जदार क्र. १ यास आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराला

अंतरीम पोटगी रु.२५००/– प्रतिमहा सदर अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून ते मुळ अर्जाच्या निकालापर्यंत देण्यात यावी.

३] सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनाशुल्क देण्यात यावी.

NEHA VIJAY SHAHU

Digitally signed by NEHA VIJAY SHAHU
Date: 2026.04.22 16:27:20 +0530

(एन. व्ही. साहू)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
अर्जुनी/मोरगांव

दि. २२.०४.२०२६